तसेच उपरोक्त शासन परिपत्रकातील सूचनांचे पालन न करता थेट पध्दतीने व सक्षम प्राधिकरणाच्या मंजूरीशिवाय बाहय यंत्रणेच्या सेवा घेतल्यामुळे कोषागार कार्यालयाकडून आक्षेप लावून देयके परत केली जातात. विहित पध्दतीने सेवा न घेतल्यामुळे खर्चास प्रशासकीय मंजूरी प्राप्त करणे शक्य होत नाही. कंत्राटदारास खर्चाची रक्कम विहित वेळेत प्राप्त न झाल्यामुळे संचालनालय व शासनाकडे अनेक तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. भविष्यात याबाबत न्यायालयीन प्रकरणे उद्‌भवू शकतात.

उपरोक्त बाबीचा विचार करता या संचालनालयाच्या अधिपत्याखालील कार्यालय/संस्थामध्ये बाहय यंत्रणेच्या सेवा उपलब्ध करुन घेणे कामी खालील कार्यापध्दीचा अवलंब करण्यात यावा.

१) संदर्भ क्रमांक १,२,३,४ या परिपत्रकातील प्रत्येक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.
२) मंजूर पदाच्या प्रमाणातच बाहय यंत्रणेकडून सेवा प्राप्त करुन घेण्यात याव्यात.
३) मंजूर पदापेक्षा जास्त पदाच्या सेवा आवश्यक असल्यास पुरेसे अनुदान प्राप्त होणेसाठी आवश्यक काल्पनिक पदे मंजूर करुन घ्यावीत व काल्पनिक पदे मंजूरी नंतरच संबंधीत पदावरील सेवा घेण्यात याव्यात.
४) जास्तीच्या पदांची आवश्यकता का आहे याबाबत योग्य ते समर्थन देऊन सविस्तर प्रस्ताव संचालनालयाकडे सादर करुन काल्पनिक पदे व खर्चास प्रशासकीय मंजूरी घेण्यात यावी.
५) उपरोक्त वित्त विभागाच्या परिपत्रकातील सूचनांचे पालन न करता थेट पध्दतीने बाहय यंत्रणेच्या घेण्यात आलेल्या सेवा रद्द करुन, शासनाने विहित केलेल्या निविदा प्रक्रियेद्वारे बाहय यंत्रणेच्या सेवा मंजूर पदांच्या प्रमाणात उपलब्ध करुन घेण्याची प्रक्रिया सुरु करण्यात यावी.
**६) बाहय यंत्रणेवरील सेवेकरीता होणारा खर्च हा कमीत कमी व प्रमाणात राहील याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थाप्रमुख व सहसंचालक यांची राहील.**
७) संस्थेच्या जागेचे क्षेत्रफळ (हेक्टर मध्ये), बांधकामाचे क्षेत्रफळ (चौ.मी.), कार्यालय/वर्गखोल्यांची संख्या, इतर स्थावर/जंगम मालमत्तेची स्वातंत्र व सविस्तर माहिती देण्यात यावी.
८) सोबत जोडलेले विवरणपत्र अ,ब,व क मधील सांखिकी माहिती अचुक भरण्यात यावी.

आपल्या विभागातील संस्था/कार्यालयामध्ये बाहययंत्रणेच्या सेवा उपलब्ध करुन घेणे कामी उपरोक्त सुचना/कार्यपध्दतीचा अवलंब करण्याबाबत आपल्या स्तरावरुन संबंधीताना सुचना देण्यात याव्यात.

( डॉ. अभय वाघ )
**संचालक,**
**तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा, मुबई.**

जा. क्र. : तंशिविकापु/आस्था-४/बाह्ययंत्रणा/२०१८/ १२४
दिनांक : 10 JAN 2018

तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.
४१२, ई, शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

प्रत : या कार्यालयाच्या अधिनस्त सर्व शासकीय संस्था प्रमुख.
त्यांना कळविण्यात येते की, संदर्भित पत्रामध्ये सूचित केल्यानुसार बाह्य यंत्रणेद्वारे घेतलेल्या वर्ग ४ च्या पदांच्या सेवेबाबतची माहिती विहीत नमुन्यात दि.१०.१.२०१८ पर्यंत मुख्य कार्यालयाच्या desk15@dtemaharashra.gov.in या ई मेल आयडी वर सादर करुन त्याची प्रत या कार्यालयाच्या est.ropune@gmail.com या ई मेल आय डी वर पाठवावी.

प्र. सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत - या कार्यालयातील प्रोग्रामर यांना सदरचे पत्र या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी रवाना.

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३,महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक:१९६७, मुंबई ४००००१.
दूरध्वनी- २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स नं.२२६९२१०२
E- mail desk15@dte.org.in internet :- http://www.dte.org.in

अत्यत महत्वाचे/तात्काळ

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे. 28 DEC 2017 आवक क्र. 12078

क्रमांक -१५/अर्थसं/प्र.मं./२०१७/१८०८
दिनांक - 20 DEC 2017

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती / नागपूर

विषय:- बाहय यंत्रणेमार्फत सुरक्षा रक्षक, सफाईगार व माळी इत्यादि (वर्ग-४) पदांच्या सेवा उपलब्ध करुन घेणेबाबत.

संदर्भ :-१. वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. पदनि-२०१०/८४/१०/विसु-१, दिनांक २७/०९/२०१०
२. वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. पदनि-२०१३/प्र.क्र.११/१३/विसु-१, दिनांक ०२/०२/२०१३
३. वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. पदनि-२०१३/प्र.क्र.११२/१३/वित्तिय सुधारण-१, दि.०२/१२/२०१३
४. वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.पदनि-२०१६/प्र.क.२९/१६/वित्तिय-१, दिनांक ०२/०८/२०१६

उपरोक्त सदर्भ क्र.१ च्या शासन परिपत्रकान्वये प्रशासनावरील खर्च कमी करुन विकास कामासाठी निधी उपलब्ध होण्यासाठी नियमित पदनिर्मिती न करता बाहेरुन करुन घेता येतील अशी कामे बाहय यंत्रणेकडून करुन घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सदर्भ क्रमांक २,३,४ च्या परिपत्रकान्वये मंजूर पदांच्या प्रमाणात शासनाने विहित केलेल्या पध्दतीने निविदा प्रक्रिया पार पाडून अत्यंत पारदर्शक पध्दतीने सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने नियमितपणे पदनिर्मिती करुन केलेल्या खर्चाच्या १० ते २५ टक्के इतकी बचत होईल. अशा रितीने वाहय यंत्रणेद्वारे कामे करुन घेण्याच्या सूचना आहेत. सदरहू परिपत्रकातील सूचनाचे पालन न करणाऱ्या संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन त्यांच्या विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

बहुतांश कार्यालये/ संस्थामध्ये संदर्भाधिन शासन परिपत्रकातील सुचनांचे पालन न करता निविदा प्रक्रियेशिवाय थेट पध्दतीने मंजूर पदापेक्षा जास्त सुरक्षा रक्षक व सफाईगाराच्या सेवा बाहय यंत्रणेकडून घेण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. अशा प्रकारे बाहययंत्रणेकडून सेवा घेतल्यामुळे देयके पारीत करण्यासाठी अनुदान कमी पडत आहे.

# काल्पनिक पदनिर्मितीचे विवरणपत्र

## विवरणपत्र-अ

संस्थेचे/कार्यालयाचे नाव :-

सन :-

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | मंजूर पदांची संख्या | काल्पनिक मंजूर करावयाच्या पदांची संख्या | काल्पनिक पदे नियमितरितीने भरली असती तर वेतनावरील वार्षिक खर्च | काल्पनिक पदे बाह्ययंत्रनेद्वारे भरल्याने त्यावर येणारा वार्षिक खर्च | बाह्ययंत्रनेमुळे होणाऱ्या बचतीची टक्केवारी | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

स्वाक्षरी

संस्था/कार्यालय प्रमुख नाव व पदनाम

# मंजूर पदावर बाह्ययंत्रनेद्वारे केलेल्या खचाचे माहिती

## विवरणपत्र-ब

**संस्थेचे/कार्यालयाचे नाव :-**

**सन :-**

| पदनाम आणि आकृतीबंधा नुसार मंजूर पदे | मंजूर पदांपैकी नियमित नियुक्तीने भरलेली पदे | मंजूर पदांपैकी बाह्ययंत्रणेद्वारे भरलेली पदे/बाह्ययंत्रणेद्वारे भरलेली मंजूर काल्पनिक पदे | रकाना क्र.३ येथील पदे नियमित रितीने भरली असती तर वेतनावरील खर्च | | रकाना क्र.३ येथील पद बसह्ययंत्रणेद्वारे भरल्याने त्यावर येणारा खर्च | | OUTSOURCING मुळे होणाऱ्या बचतीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | | ५ | | ६ |
| | | | मासिक | वार्षिक | मासिक | वार्षिक | |
| | | | | | | | |

स्वाक्षरी

संस्था/कार्यालय प्रमुख नाव व पदनाम

# स्थावर व जंगम मालमत्तेची माहिती

## विवरणपत्र-क

संस्थेचे/कार्यालयाचे नाव :-

संस्थेचे ऐकुण क्षेत्रफळ (जमीन) हेक्टर/चौ.मी. :-

| अ.क्र. | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | बांधकाम क्षेत्रफळ | वर्ग खोल्या<br>१) संख्या .....<br>२) क्षेत्रफळ (चौ.मी.)<br>..... | कार्यालयीन इतर खोल्या<br>१) संख्या .....<br>२) क्षेत्रफळ (चौ.मी.) ..... | एकुण खोल्या<br>१) संख्या .....<br>२) क्षेत्रफळ (चौ.मी.) ..... |
| २ | बगीचा क्षेत्रफळ (चौ.मी.) | | | |
| ३ | मैदानाचे क्षेत्रफळ (चौ.मी.) | | | |
| ४ | गेटची संख्या | | | |

स्वाक्षरी

संस्था/कार्यालय प्रमुख नाव व पदनाम